**श्री. रामदास चव्हाण,** अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :-समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे-५

दूरध्वनी क्रमांक :-२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :- स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई-मेल :- sdd@punecorporation.org
जावक क्रमांक :- सविवि/ २४४४
दिनांक :- १८/११/२०२५

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.
अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. ६ /२०२५

अपिलार्थी नांव व पत्ता :-
श्रीमती मिनाताई धोत्रे
रा. १००१ दिप बंगला चौक, शिवाजीनगर, पुणे

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
श्री. असंग पाटील,
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

श्रीमती मिनाताई धोत्रे --- अपिलार्थी

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी दिनांक ३०/९/२०२५रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १५/९/२०२५ | १४/१०/२०२५ | २९/९/२०२५ | - | - |

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक २९/९/२०२५ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना दिलेल्या माहितीनुसार समाधान न झाल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| २८/१०/२०२५ | ३०/९/२०२५ | होय | लागू नाही | १०/११/२०२५ |

**<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u>** दिनांक १२/११/२०२५, दु. ३.०० वाजता.

**<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक १२/११/२०२५रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: उपस्थित होते.

**<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक १२/११/२०२५रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-**

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | समाज विकास विभागाचे कार्यरत असलेले उपायुक्त अरविंद माळी यांची कर्तव्य सूची | मुख्य समाज विकास अधिकारी व समाज विकास विभागाकडील अधिकारी/ कर्मचारी यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे तसेच समाज विकास विभागाकडील विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करून घेणे (सद्यस्थितीत श्री. अरविंद माळी यांची बदली झाली आहे. ) |
| २ | नागरिकांना भेट्याची वेळ मागील मे २०२५ ते सप्टेंबर २०२५ पर्यंत ते किती नागरिकांना भेटले याची संपूर्णपणे अद्यायावत माहिती/ आता पर्यंतची माहिती | अशा प्रकारची अद्यायावत माहिती खात्यामार्फत ठेवणेत आली नाही. |
| ३ | अरविंद माळी यांच्या नियंत्रणात काम करणारे समाज विकास अधिकारी असंग पाटील यांना हालचाल रजिस्टरमध्ये नोंद न करता कार्यालय सोडून बाहेर फिरण्याची सूट/ मुभा/ अनुमती दिल्याबाबतचे सर्व दस्त्ऐवज | अशा प्रकारचे दस्तऐवज कार्यालयाकडे उपलब्ध नाही. |

"विवेचन"

अपिलार्थी मीनाताई धोत्रे या दिव्यांग असल्याने यांच्या वतीने श्री. सुनिल पवार हे युक्तीवाद करीत आहे. सदर बाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, खंडपीठाच्या निर्देशाचे उल्लंघन पद निर्दीशस्ट अपिल अधिकाऱ्यांचे नाव उल्लेख न करणे , प्राप्त झालेली माहिती दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली, जन माहिती अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५६ अन्वये निष्काळजीपणा व कुचराई केली. मुद्दा १ बाबत कर्तव्य सुची मिळणेबाबत मागणी केली होती व मुद्दा २ बाबत सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार उप आयुक्त यांना किती नागरिकांनी भेट दिली त्याची नोंद असलेल्या भेट रजिस्टर ची माहिती मिळणेबाबत मागणी केली. सदर माहिती न दिल्याने शासनाच्या परिपत्रकाचे उल्लंघन केल्याचे दिसून येते. मुद्दा क्र. ३ हालचाल रजिस्टर बाबत जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती लपवण्यात आली. जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती दडवल्याबाबत शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, असे अपिलकर्त्यांने सुनावणी दरम्यान त्यांचे म्हणणे मांडले.

"आदेश"

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांचे विवेचनानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सदरची माहिती अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ची माहिती दि. २०/११/२०२५ पर्यंत उप आयुक्त यांची ड्युटी लिस्ट व कर्तव्य सूची उपलब्ध करून द्यावी, असे आदेश दिले आहेत.

मुद्दा क्र.२ नुसार मा. उप आयुक्त यांचेकडे परिमंडळ क्र. २, समाज कल्याण व समाज विकास विभागाची जबाबदारी असल्याने व बसण्याचे ठिकाण एकच नसल्याने अद्यावत माहिती ठेवणेत आली नाही. समाज विकास विभागाकडील अधिकारी व सेवकांचे हालचाल रजिस्टर ठेवण्यात आले असून श्री.असंग पाटील यांना हालचाल रजिस्टरमध्ये नोंद न करता कार्यालय सोडून बाहेर जाणेबाबतचे कुठलेही दस्त नाहीत. अर्जदाराचे माहितीने समाधान झाले असल्याने प्रकरण निरस्त करणेत येत आहे.

(रामदास चव्हाण)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग ,पुणे महानगरपालिका

दिनांक :- 24/11/25
ठिकाण :- पुणे.
टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

४) श्रीमती मिनाताई धोत्रे,१००१ दिप बंगला चौक, शिवाजीनगर, पुणे

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी